महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय (विस्तार), दालन क्र.४३२,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.

दूरध्वनी क्र:- Email ID:- sm2.scsd-mh@gov.in

क्रमांक:-एसएफएस-१०२३/प्र.क्र.९१८/एसएम-२ दिनांक २७ सप्टेंबर, २०२४

मान्यता पत्र

प्रति,
अध्यक्ष / सचिव,
दमानी एज्युकेशन फाउंडेशन,
प्लॉट नं.१९३, ब्लॉक ३, जे.बी.मार्ग, नरिमन पॉईट, मुंबई ४०००२१.

विषय- महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा सुरू करण्यासाठी किंवा विद्यमान शाळांचा दर्जावाढ करण्यासाठी मान्यता पत्र
दमानी एज्युकेशन फाउंडेशन, नरिमन पॉईट, मुंबई संचलित सरस्वती विद्या ॲकॅडमी, गट नं.८३, ८४, ८५ व ८६, शिलाटणे, ता.मावळ, जि.पुणे

संदर्भ- इरादा पत्र क्रमांक एसएफएस-१०२३/प्र.क्र.९१८/एसएम-२, दिनांक २०/११/२०२३

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत दमानी एज्युकेशन फाउंडेशन, नरिमन पॉईट, मुंबई संचलित सरस्वती विद्या ॲकॅडमी, गट नं.८३, ८४, ८५ व ८६, शिलाटणे, ता.मावळ, जि.पुणे उच्च प्राथमिक ते उच्च माध्यमिक (इ.०६ वी ते इ.१२ वी, सर्व शाखा, इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई.) ही स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर नवीन शाळा सुरू करण्याकरीता अर्ज सादर केला होता.

२. आपल्या अर्जाच्या संदर्भात, महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ आणि महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) नियम, २०२० अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ पासून दमानी एज्युकेशन फाउंडेशन, नरिमन पॉईट, मुंबई संचलित सरस्वती विद्या ॲकॅडमी, गट नं.८३, ८४, ८५ व ८६, शिलाटणे, ता.मावळ, जि.पुणे उच्च प्राथमिक ते उच्च माध्यमिक (इ.०६ वी ते इ.१२ वी, सर्व शाखा, इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई.) ही नवीन शाळा स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर सुरू करण्यासाठी, अटी व शर्तीसह संदर्भाधिन इरादा पत्र दिले होते. सदर शाळेस आता शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून पुढील अटी व शर्तीच्या अधीन राहून मान्यता पत्र देण्यात येत आहे.

३. अटी व शर्ती:-

१) प्रस्तावित शाळा, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ याद्वारे निर्धारित केलेल्या सर्व मानकांची, अटीची व शर्तीची आणि या अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या निदेशांची किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांची किंवा प्रमाणकांची किंवा अटीची आणि शर्तीची पूर्तता करील.

२) नोंदणीकृत संस्थेने किंवा न्यासाने किंवा कंपनीने, महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ याद्वारे निर्धारित केलेल्या सर्व मानकांचे, अटीचे व शर्तीचे आणि या अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या निदेशांचे किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांचे किंवा अटींचे आणि शर्तीचे पालन करणे अनिवार्य आहे.

३) सी.बी.एस.ई. किंवा सी.आय.एस.सी.ई. किंवा सी.ए.आय.ई. किंवा आय.बी. इत्यादी मंडळाच्या संलग्नतेसाठी इच्छुक शाळा व्यवस्थापनांनी, शासनाने वेळोवेळी दिलेल्या निदेशांनुसार, शासनाकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेणे अनिवार्य आहे.

४) शाळा व्यवस्थापन, शासनाने मंजूर केलेल्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात करण्यापूर्वी संबंधित जिल्ह्याच्या शिक्षण अधिकाऱ्यास कळवील.

५) या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये नवीन शाळेची स्थापना करण्यासाठी किंवा शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी दिलेली परवानगी, ती ज्या शैक्षणिक वर्षासाठी मंजूर केली आहे, त्याच वर्षासाठी असेल.

६) जर शाळा व्यवस्थापन, १८ महिन्यांच्या आत, शाळा सुरु करण्यास अपयशी ठरल्यास, दिलेले मान्यता पत्र रद्द होईल.

७) शाळा व्यवस्थापनास, मंजूर केलेले शिक्षणाचे माध्यम, शाळेचे ठिकाण, भविष्यात, शासनाच्या परवानगीशिवाय बदलता येणार नाही.

८) जर शाळा व्यवस्थापनाने, शासनाने मंजुरी दिलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा स्थापन केली असेल तर, त्या शाळेची परवानगी रद्द होईल.

९) अशी तरतूद करण्यात आली आहे की, स्वयंअर्थसहाय्यित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती शासनाच्या प्रचलित नियमांनुसार व विनियमांनुसार करण्यात यावी.

१०) जिल्हानिहाय माहिती भरतेवेळी, ज्या शाळेस परवानगी देण्यात आली आहे, ती शाळा, स्वतंत्र प्रवर्ग म्हणून "स्वयंअर्थसहाय्यित शाळा" अशी माहिती भरतील व यु.डी.आय.एस.इ. क्रमांक मिळवितील. यासंबंधात, राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांस, नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे.

११) शाळा व्यवस्थापन, शाळा परिसराच्या प्रवेशद्वारावर "स्वयंअर्थसहायित परवानगीप्राप्त शाळा" असा फलक लावतील.

१२) या अधिनियमाच्या कोणत्याही किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदीचा भंग केल्याच्या किंवा अधिनियमान्वये दिलेल्या कोणत्याही निदेशांचे किंवा शासनाने वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांचे किंवा प्रमाणकांचे अथवा अटी व शर्तीचे अनुपालन करण्यात कसूर केल्याच्या कारणावरुन, कोणत्याही वेळी, राज्य शासन, दिलेले मान्यता पत्र रद्द करु शकेल.

१३) शासन परिपत्रक दि.०२ जून २०१८ अन्वये विद्यार्थी सुरक्षा संदर्भात दिलेल्या मार्गदर्शक सूचना व शासन निर्णय दि.२१ ऑगस्ट २०२४ अन्वये विद्यार्थी/विद्यार्थीनीच्या सुरक्षाविषयक उपाययोजनांची काटेकोर अंमलबजावणी करणे अनिवार्य राहील.

२७/०९/२५

(सि.सा.घोरपडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत-

१. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
३. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे.
६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जि.प. पुणे.
७. निवडनस्ती (एसएम-२)(९१८/२०२३)